| | पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक – पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | |
|---|---|---|

प्रेस नोट दिनांक :०१/०७/२०२४

## नाशिक ग्रामीण पोलीस भरती - २०२२-२३

---

नाशिक ग्रामीण पोलीस दलाअंतर्गत ३२ पोलीस शिपाई पदांकरीता भरती प्रक्रिया राबविली जात असून दिनांक १९/०६/२०२४ रोजी पासून पोलीस मुख्यालय मैदान, आडगाव येथे भरती प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली होती. भरती प्रक्रियेदरम्यान दिनांक १९/०६/२०२४ ते २२/०६/२०२४ या कालावधीत उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली.

मैदानी चाचणी पुर्ण केलेल्या उमेदवारांना मिळालेल्या गुणांबाबत त्याचवेळी समक्ष सांगण्यात आलेले आहे. भरती प्रक्रियेतील उमेदवारांची मैदानी चाचणी पुर्ण संपलेली असून मैदानी चाचणीमध्ये प्राप्त गुणांबाबतची दैनंदिन यादी नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे वेबसाईट व पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे. मैदानी चाचणीमधून लेखी परिक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची यादी दिनांक २८/०६/२०२४ रोजी नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे संकेतस्थळावर प्रसिदध करण्यात आली आहे.
( https://www.nashikruralpolice.gov.in/ )

लेखी परिक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची दिनांक ०७/०७/२०२४ रोजी सकाळी ०७:०० वाजता भुजबळ नॉलेज सिटी,कॉलेज, नाशिक ग्रामीण पोलीस मुख्यालयाजवळ, आडगाव नाशिक येथे आयोजीत करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी लेखी परिक्षेचे हॉल तिकीट महाआयटी यांचे संकेतस्थळावरुन डाउनलोड करुन घ्यावे.परिक्षेला येतांना उमेदवारांनी सोबत आधारकार्ड व हॉलतिकीट घेवुन वेळेत हजर रहावे.

नाशिक ग्रामीण पोलीस दलातील पोलीस शिपाई पदांकरीता भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व निपक्षपातीपणे सुरू असून कोणीही उमेदवाराने कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये. कोणीही भरती संदर्भात प्रलोभन दाखवत असेल, अशा इसमाविरूध्द कारवाई करण्यात येईल असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.